**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-440001**

**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र कमांक.नाविमं/प.मा/378
दिनांक :– 27/01/2025
28

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
जिल्हा परिषद भंडारा, चंद्रपूर, नागपूर,
वर्धा, गडचिरोली, गोंदिया,

**विषय** : फेब्रुवारी/मार्च – 2025 च्या इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षेचे आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरणे वा अन्य कारणास्तव शाळा/क.म.कडून प्रवेशपत्र उपलब्ध न होण्याच्या प्रकरणात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भः–** 1)शासनाचे पत्र क. संकीर्ण–0322/प्र.क.30/एसडी–2 दि. 10 मार्च, 2022
2) राज्य मंडळ पत्र क.रा.मं./परीक्षा – 7/312 दिनांक 23–01–2025

उपरोक्त विषयास अनुसरून सुचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ. 10 वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ. 12 वी फेब्रुवारी/मार्च 2025 च्या परीक्षेसाठी मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मंडळामार्फत दिलेले प्रवेशपत्र (Hallticket) संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मार्फत वितरीत करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तथापि, विद्यार्थ्यांनी शालेय शुल्क न भरल्यामुळे प्रवेशपत्रासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाणे अथवा विद्यार्थ्यांना हॉलतिकीट न देणे ही बाब महाराष्ट्र विधान परीषद अंतर्गत म. वि. प. नियम 93 अन्वये प्राप्त सूचनेद्वारे उपस्थित करण्यात आली होती. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याबाबत शासनाच्या संदर्भिय पत्राद्वारे आदेश प्राप्त झालेले आहेत.

इ. 12 वी व इ. 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्र (Hallticket) वितरणामध्ये उपरोक्तप्रमाणे अडचणी येत असल्यास त्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. शालेय शुल्क न भरल्याने मंडळाच्या इ. 10 वी व इ. 12 वी च्या परीक्षेचे प्रवेशपत्र (Hallticket) देण्याबाबत कनिष्ठ महाविद्यालय/शाळांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्यास अथवा त्यांना प्रवेशपत्र प्राप्त होत नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालय/शाळेशी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांचेशी त्वरीत संपर्क साधावा.
2. संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांचेशी संपर्क साधावा व अशा विद्यार्थ्यांच्या तपशिल विभागीय मंडळास तात्काळ उपलब्ध करून द्यावा.
3. संबंधित विभागीय मंडळ अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र (Hallticket) गणकयंत्र विभाग राज्य मंडळ यांचेकडून सॉफ्ट कॉपी स्वरूपात ई मेलद्वारे उपलब्ध करून देतील.

4. सदर सॉफ्ट कॉपी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांना त्यांच्या अधिकृत ई मेलवर उपलब्ध करून द्यावे.
5. संबंधित अधिका-यांनी सदर सॉफ्ट कॉपीची प्रिंट काढावी व त्यातील माहितीची संबंधित विद्यार्थ्यांकडून खातरजमा करून घ्यावी. अशा योग्य असलेल्या प्रकरणात सदर हॉलतिकीट संबंधित अधिका-यांनी स्वत:च्या सही शिक्क्याने प्रमाणित करून संबंधित विद्यार्थ्यास द्यावे. सदर प्रमाणीकरणासाठी प्रवेशपत्रावर मुख्याध्यापक यांचेकरीता निर्धारीत केलेली जागा वापरावी.
6. उपरोक्तप्रमाणे सॉफ्ट कॉपीवरून काढलेल्या प्रिंटमधील आशयामध्ये काही बदल असल्यास याबाबत त्वरीत विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांचेशी संपर्क साधून त्यामध्ये बदल करून घ्यावेत व तद्नंतर प्रवेशपत्र (Hallticket) प्रमाणित करून विद्यार्थ्यास देण्यात यावे.
7. संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी प्रवेशपत्रासंबंधात उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा कनिष्ठ महाविद्यालय/शाळा व विद्यार्थीनिहाय एकत्रित अहवाल परीक्षा सुरू झाल्यानंतर त्वरीत संबंधित विभागीय अध्यक्ष/विभागीय सचिव यांना लेखी स्वरूपात सादर करावा.
8. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार प्रवेशपत्र (Hallticket) प्राप्त करून घेतलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ करून घेणेबाबत सूचना संबंधित केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांना विभागीय मंडळ स्तरावरून देण्यात येतील.
9. मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्र सादर केलेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.
10. सदर पर्यायी व्यवस्था फक्त फेब्रुवारी/मार्च–2025 परीक्षेसाठीच उपलब्ध असेल.

तसेच मंडळ कार्यालयास आवेदनपत्र सादर केलेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रत माहितीस्तव :–**

**1) मा. सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–4 यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.**
**2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.**